

सत्यमेव जयते

Glorious 70 Years

# राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई

आणि

# राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

125 YEARS OF CELEBRATING CHICAGO SPEECH

संयुक्त विद्यमाने

# राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी राज्यस्तरीय कार्यशाळा २०१९

# सक्षम युवा समर्थ भारत अभियान

# अहवाल पुस्तिका



# | उद्घाटन समारंभ |


















# राज्यस्तरीय

# कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा–२०१९

मा .राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन , मुंबई आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आयोजित दिनांक २३ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी शिवछत्रपती क्रिडापीठ, बालेवाडी, पुणे या ठिकाणी राज्यस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील २५ विद्यापीठातील १५०० कार्यक्रम अधिकारी व १५ कार्यक्रम समन्वयक उपस्थित होते .या कार्यशाळेचे उद्घाटन दिनांक २३ फेब्रुवारी सकाळी ११ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, शिवछत्रपती क्रिडापीठ पुणे येथील आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा. राजेश पांडे, डॉ. संजय चाकणे, डॉ. विलास उगले, मा. अधिसभा सदस्य श्रीमती बागेश्री मंठाळकर, रासेयो राज्यसंपर्क अधिकारी डॉ. अतुल साळुंके, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रासेयो संचालक, डॉ. प्रभाकर देसाई आणि रासेयो सदिच्छा दूत श्रीमती नवेली देशमुख या सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाले.

या कार्यशाळेचे उदघाटनपर भाषण करीत असताना डॉ. नितीन करमळकर म्हणाले की, रासेयो स्वयंसेवक हा नेहमीच विधायक कामे हाती घेऊन ती पूर्णत्वास नेत असतो. या सर्व स्वयंसेवकांना घडविण्याचे काम आपण सर्व कार्यक्रम अधिकारी करीत असता. आजवर या स्वयंसेवकांच्या मदतीने आपण ग्रामविकास ते शहरातील वाहतूक सुरक्षा अशा विविध कामांना आपण पूर्णत्वास घेऊन गेला आहात. याच रासेयोच्या माध्यमातून

स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होते. तरुणांचे ग्रामीण भागाशी नाळ जोडून ठेवण्याचे महत्वाचे साधन रासेयो असून भविष्यातील समृद्ध भारत घडविण्यास याचमुळे मदत होईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी प्रशासकीय काम करीत असताना आलेल्या विविध अनुभवांचा धांडोळा घेतला. ज्ञानाला सेवेची जोड मिळाली तर करीत असलेल्या कामातून निश्चितच आनंद मिळेल. स्वतःचे अनुभव व्यक्त करीत असताना ते म्हणाले की, प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत असताना मला अनेक अडचणी आल्या तरीसुद्धा मी न डगमगता पारदर्शी कारभार केला. त्यामुळेच माझ्या कामाचा आलेख हा वाढतच राहीला आहे .जिवनात संघर्ष आवश्यक आहे. त्याशिवाय आपण योग्य मार्गावर आहे याची प्रचिती आपणास येत नाही. आपण चांगल काम करीत असताना आपणास त्रास होणार हे गृहीत धरूनच काम करा. उद्याच्या भारताचे नेतृत्व करणारा तरुण वर्ग आपल्याकडे आहे .त्याच्या हातून आपण भारत घडवूयात एवढीच अपेक्षा. अशी अपेक्षा व्यक्त करीत डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला. अध्यक्षीय भाषण संपन्न झाल्यानंतर पहिले सत्र संपले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्राची सुरुवात पुलवामा येथे शहीद झालेल्या जवानांना आणि राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना श्रद्धांजली वाहून झाली. या सत्राचे प्रास्ताविक डॉ. अतुल साळुंके यांनी केले. प्रास्ताविकात ते म्हणाले की, आजवर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र हे रासेयो कामगिरीत अग्रेसर राहिले आहे. रासेयो मध्ये केले जाणारे नाविन्यपूर्ण उपक्रम हे त्याचे द्योतक आहे. यासंदर्भात दाखले देताना ते म्हणाले की, यावर्षीची पंढरपुरची आषाढी वारी

ही प्लास्टिकमुक्त व्हावी हा विचार रासेयोने केला त्यादृष्टीकोनातून कामाची आखणी केली. २८ लाख पानांच्या पत्रावळीचे वाटप आणि प्लास्टिकमुक्त वारीसाठी प्रबोधन केले आणि त्याचीच फलश्रुती म्हणून यावर्षीची ८० टक्के वारी ही आपणास स्वच्छ दिसली. अशा अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांचा त्यांनी यावेळी उल्लेख केला.

या सत्रात उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्रीमहोदय, मा. विनोद तावडे उपस्थित होते. यावेळी त्यांनी उपस्थितांशी दिलखुलास गप्पा मारीत कार्यक्रम अधिकाऱ्यांची नेमकी भूमिका व त्यांच्याकडून असणारी अपेक्षा व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की, रासेयो विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सक्षम गावं जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत आपण त्याच गावात काम करीत राहणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या पातळीवर एखाद्या विकसित गावाचे मॉडेल रासेयो ने तयार करावे त्यासाठी महाराष्ट्र शासन वाटेल ती मदत करण्यास तयार आहे. ग्रामीण भागात जाऊन विविध प्रयोग करा त्याद्वारे त्या गावाला सक्षम बनवा, गावाचा रोजगार गावातच तयार करता येतो का ते पहा. जेणेकरून खेडी संपन्न होतील त्यासाठी आम्ही सर्वजण शासन म्हणून आपल्या पाठीशी आहोत असा विश्वास मंत्री महोदयांनी दिला. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, रासेयो विभाग संपादीत 'युवास्पंदन' आणि पुणे ते पंढरपूर या दिंडी अहवाल पुस्तिकेचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. दुसऱ्या सत्राची सांगता डॉ. प्रभाकर देसाई यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. देवानंद शिंदे

म्हणाले की, मातीशी आणि घरातील व्यक्तीशी असणारे नाते आणि संवाद तुटत चालला आह. यामुळेच बऱ्याच गोष्टींना आपल्याला सामोरे जावे लागत आहे. स्वतःच्या आयुष्यात आलेल्या अनेकाविध अनुभवांचे दाखले देत त्यांनी या मुद्द्यांना पटवून दिल. याबरोबरच रासेयो स्वयंसेवकांनी आपली नाळ ग्रामीण भागाशी जोडत संस्कार आणि संवाद या माध्यामातून स्वतःला संपन्न बनविण्याचा प्रयत्न करावा. रासेयो मध्ये अनेक प्रयोग आपणास करता येतील त्यासाठी आपण प्रयत्नशील रहावे जेणेकरून स्वयंसेवकांना स्वतःच्या जगण्याचा उद्देश लक्षात येईल.

डॉ. नितीन करमळकर यांनी या सत्राचा समारोप करीत असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण योजनांचा आढावा घेतला. पुणे ते पंढरपूर या वारीच्या माध्यमातून केलेल्या अनेक विकास कामांमुळे झालेला बदल त्यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिला. रासेयो उपक्रमांना आम्ही सर्व कुलगुरू नेहमीच मान्यता देत असतो कारण रासेयो विभाग हा अतिशय वेगाने एखाद्या कामाचा प्रत्यय आम्हास आणून देतो. त्यामुळे माझ्या दृष्टीने हा विभाग नेहमीच अभिनंदनास पात्र ठरला आहे. मी नेहमी असा विचार करतो की, महाविद्यालयीन आयुष्य उपभोगणारी ही पिढी रासेयो मुळे एका विशिष्ठ चाकोरीत येते आणि जगण्याला एक आयाम देते. अशाप्रकारे रासेयोचे काम अतिशय जवळून पाहणाऱ्या दोन्ही कुलगुरूंनी रासेयो कार्यक्रम अधिकारी व संचालकांचे या वैशिष्ट्यपूर्ण कामाबद्दल अभिनंदन केले. पहील्या दिवसाची सांगता सरहद्द महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली. काश्मिरहुन पुण्यामध्ये शिक्षण घेण्यासाठी आलेल्या या विद्यार्थ्यांनी लावणी, भावगीते, देशभक्तीपर गीते आणि कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सादर केलेल्या पसायदान यामुळे या

कार्यक्रमास एका वेगळ्या उंचीवर नेऊन पोहचविले. त्यामुळे उपस्थितांनी या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. भोजनानंतर पहिल्या दिवसाची सांगता झाली.

दि. १४ फेब्रुवारी सकाळचे सत्र स्वतःच्या कार्यकर्तृत्वाने संपन्न असणाऱ्या आणि रासेयोचा विधायक कामासाठी कशापद्धतीने उपयोग करता येईल हे स्वानुभवातून संपन्न असणाऱ्या व्यक्तींचे होते. यामध्ये प्रथमतः मा. गिरीश प्रभुणे यांनी मार्गदर्शन केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील यमगरवाडी येथे भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नांबाबत त्यांनी दिलेला लढा, शिरूर तालुक्यात काम करीत असताना ग्रामविकासासाठी केलेली कामे आणि सर्वात महत्वाचे पाणी नियोजनासाठी केलेले काम हे सर्व अनुभव कार्यक्रम अधिकाऱ्यांना प्रेरणा देणारे ठरले. ज्वारी-बाजरी अशा महत्वपूर्ण पिकांना पर्याय म्हणून गव्हाचे पिक मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. याबाबत मानवी आरोग्य आणि शेती यांचा समन्वय साधण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी जनजागृती करणे अत्यावश्यक असल्याचे मत गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केले. ग्रामीण भागाशी संवाद साधत तेथील मुलभुत प्रश्न आणि शेतीविषयक व आरोग्यविषयक सुधारणा यावरती आपण काम करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले.

चैत्राम पवार यांनी स्वतःचा प्रवास करित असताना आलेल्या अनुभवांचे गाठोडे सर्वांसमोर खुले केले. स्वतःच्या गावासाठी झटणारा एक सामान्य कार्यकर्ता ते शासनाच्या विविध ग्रामविकास योजनांचा मार्गदर्शक असा चैत्राम पवार यांचा प्रवास सर्वांना अवाक करणारा ठरला. गावासाठी काम करायचे असेल तर आपणास संघटन आवश्यक असते. एका वैशिष्ट्यपुर्ण कामाला आपणास वाहुन घ्यावे लागते. अशावेळी अनेक

संकटाना आपणास सामोरे जावे लागते. अशा काळात न डगमगता स्वतःच्या कामावरच लक्ष केंद्रीत करावे. कामाचा पाया घातला की, लोक आपल्याबरोबर आपसुकच येतात. त्यांना अशावेळी सहभागी करून योग्य ती दिशा देणे आवश्यक ठरते. रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी अशा प्रकारच्या कामांना पाठींबा द्यावा, अशा गावांचा शोध घ्यावा आणि त्यामाध्यमातून आपण काम करावे जेणेकरून गाव समृद्ध होण्यास मदत होईल. ग्रामविकास झाला की, शहरात येणारी लोकसंख्या आपोआपच थांबेल. बेकारी, उपासमारी असे शहरात जाणवणारे प्रश्न यामुळे कायमचे थांबतील.

रासेयो कार्यक्रम अधिकारी ते रासेयो सल्लागार असा प्रवास लाभलेले आणि रासेयोच्या माध्यमातुन नाविन्यपुर्ण प्रयोगासाठी ओळखले जाणारे एक विद्यार्थीप्रिय प्राचार्य, पुणे ते पंढरपुर दिंडी उपक्रम, आव्हान, उत्कर्ष अशा अनेक महत्वपुर्ण शिबिरांचे जन्मदाता अशी बहुआयामी ओळख असणारे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी ‘समर्थ भारत अभियान’ या नाविन्यपुर्ण विषयावर काम केल्यानंतर या अभियानास पुन्हा एकदा सुरु करणे अत्यावश्यक असल्याचे सांगीतले. त्यासाठी स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांनी कोणत्या भुमिका घ्याव्यात? त्यासाठी उपाययोजना कशा राबवाव्या? एक कार्यक्रम अधिकारी आणि प्राचार्य यांचा संवाद त्यासाठी कसा असावा? अशा अनेक बाबींवरती डॉ. संजय चाकणे यांनी मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान काम करत असताना, गावाचा इतिहास व आराखडा किती आवश्यक आहे याबाबत त्यांनी चर्चा केली. इंदापूर या ठिकाणी रासेयो स्वयंसेवकांना घेऊन काम करीत असताना इंदापूर गाव कचरामुक्त कशाप्रकारे केले, त्यासाठी कोणत्या उपायोजना केल्या. या अथक परिश्रमाचे फळ म्हणून आज इंदापुर निर्मलग्राम योजनेच्या बक्षीसास पात्र

ठरले. यासाठी स्वयंसेवकांनी केलेले काम कौतुकास्पद आहे असे ते म्हणाले. त्याचबरोबर कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी गावात जाऊन कसे काम करावे? विज्ञान शाखेत शिकणाऱ्या मुलांनी गावातील पाण्याचा, वनस्पतींचा व परिसराचा परिपुर्ण अभ्यास करून त्याच्यावर उपाय सुचवावे. माती व पाणी यांच्या परीक्षणामुळे मोठ्याप्रमाणात आपणास जनजागृती करता येईल. गाव सक्षम झाल्यास हा देश सक्षम व समर्थ होईल. असा विचार डॉ. संजय चाकणे यांनी मांडला.

'समर्थ भारत अभियान' हाच विचार पुढे घेऊन मा. राजेश पांडे यांनी मार्गदर्शन केले. युवाविकास, युवानेतृत्व, यासाठी रासेयोची असलेली आवश्यकता मा. राजेश पांडे यांनी व्यक्त केली. विद्यापीठाच्या विविध पदांवर काम करीत असताना रासेयो विभागाला घेऊन ग्रामविकासासाठी एक चळवळ उभी करणे किती आवश्यक आहे यासंदर्भात त्यांनी कार्यक्रम समन्वयक आणि कार्यक्रम अधिकारी यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन आयुष्यात या तरुणांना विधायक कामासाठी उभा करून त्यांच्या उर्जेला एक दिशा देणे आवश्यक आहे. एवढी मोठी युवकांची उर्जा तुम्हाला कुठेही मिळणार नाही, अशी युवकांची ऊर्जा तुम्हाला मिळते आहे. या उर्जेचा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी वापर करावा. कारण आजवर या देशाला घडविण्याचे काम तरुणांनीच केले आहे. उद्याच्या भारताचं नेतृत्व करणारा एक सक्षम युवक याच रासेयो स्वयंसेवकांतून घडेल आणि त्याचे संपूर्ण श्रेय हे तुम्हा कार्यक्रम अधिकाऱ्यांना व कार्यक्रम समन्वयकांना मिळेल असा आशावाद मा. राजेश पांडे यांनी व्यक्त केला.

डॉ. नितीन घोरपडे यांनी स्वतःहून केलेले रासेयो शिबिरातील अभिनव उपक्रम कार्यक्रम अधिकाऱ्यांसमोर मांडले व या सर्व कामाची

पुस्तिका त्यांनी संपादीत केली आणि त्याचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते केले. शासनाच्या विविध योजना गावापर्यंत अगदी शेवटच्या गरजू व्यक्तीपर्यंत पोहचविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक माहितीदूत म्हणून काम करू शकतो असे मत माहिती व जनसंपर्क विभागाचे उपसंचालक मा. मोहन राठोड यांनी व्यक्त केले. रासेयोचा स्वयंसेवक समाजात जाऊन नेहमीच व्यापक काम करीत असतो त्यांच्या कामाला आणखी व्यापक बनविण्यासाठी माहितीदूत ही भूमिका महत्वाची असेल आणि त्याचा फायदा सामान्यांना लगेच होईल असेही ते म्हणाले. यानंतर मान्यवरांनी केलेले मार्गदर्शन आणि त्याच्या जोडीला कार्यक्रम अधिकारी स्वताःच्या विद्यापीठात कोणते महत्वपुर्ण उपक्रम राबवित आहेत आणि भविष्यात कोणते राबविणार? यासंदर्भाने गटचर्चा घेण्यात आली. प्रत्येक विद्यापीठाने तो अहवाल डॉ. अतुल साळुंके आणि डॉ. संजय चाकणे यांच्याकडे सुपुर्द केला.

या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी उपस्थित होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात स्वतः रासेयो कार्यक्रम अधिकारी असताना शिबिरांमध्ये ग्रामविकासासाठी केलेल्या कामांचा आढावा थोडक्यात सांगितला. रासेयो मध्ये सुसुत्रता असणे आवश्यक आहे. नेतृत्व, कर्तुत्व आणि वक्तृत्व यांच्या जोडीला श्रम, संस्कार, शिस्त यामाध्यमातुन आपला स्वयंसेवक घडतो आहे. त्यांना संपन्न बनविण्याची जबाबदारी आपली आहे. त्यासाठी आपण प्रयत्नशील राहावे यासाठी डॉ. एन. एस. उमराणी यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर डॉ. प्रभाकर देसाई यांनी उपस्थितांचे आभार मानले व राष्ट्रगीताने या राज्यस्तरीय कार्यक्रम अधिकारी कार्यशाळेचा समारोप झाला.

# । मान्यवरांचे मार्गदर्शन ।















**150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA**

**125 YEARS OF CELEBRATING CHICAGO SPEECH**




